**औंदुबर कडलासकर वगैरे वि.**
**अर्जुन श्रीमंत कडलासकर वगैरे**

## आदेश निशाणी क्रमांक ३८ वर

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. १/ प्रतिदाव्यातील वादी क्र. १ चे वारसांनी वारस रेकॉर्डवर घेणेसाठी व त्याप्रमाणे दाव्याच्या सरनाम्यात दुरूस्ती करणेची मागणी केली आहे.

२. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरूध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. मुळ प्रतिवादी क्र. १ व प्रतिदाव्यातील वादी क्र. १ अर्जुन श्रीमंत कडलासकर यांचे दिनांक २९.०३.२०२२ रोजी निधन झालेले आहे. प्रतिवादी कुटुंब दुखात असलेने व आजारपणामुळे त्यांच्या वारसांना वेळेत रेकॉर्डवर घेता आले नाही. त्यामुळे प्रतिदाव्याच्या सरनाम्यात वादी क्र. १ च्या नावापुढे "मयत वारस" अर्जात दिल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १अ ते १इ असे दुरूस्तीने लिहिण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ७ यांनी आपले म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर नाही. विलंब माफीचा अर्ज व वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज हे एकच अर्जामध्ये दाद मागता येणार नाही. विलंब माफ झाल्याशिवाय वारसांना रेकॉर्डवर घेणेची परवनागी मागता येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे. अर्जातील कारण कायदेशीर नाही. प्रतिदाव्यातील वादी क्र. १ चे वारसांना दाव्यातील निशाणी क्र. २७ चे अर्जाचेकामी नोटीस मिळाल्यानंतरही विलंब माफीचा व वारस रेकॉर्डवर आणणेचा अर्ज जाणून बुजून उशिरा दाखल केलेला आहे. जर अर्ज मंजुर करायचे झाल्यास प्रतिवादी क्र. १ चे वारसांकडून रूपये २०००/– इतके खर्चाची रक्कम आकारण्यात यावी.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने वाटपासाठी दाखल केलेला आहे. यातील वादींनी निशाणी क्र.४० सोबत प्रतिवादी

क्र. १ च्या मृत्यूप्रमाणपत्र दाखल केलेले आहे. तसेच त्यात प्रतिवादी क्र. १ अर्जुन श्रीमंत कडलास्कर यांची मृत्यूतारीख २९/०३/२०२२ अशी नमूद आहे. प्रतिवादी क्र. १ यांना अर्जात नमूद वारसांव्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ प्रतिवादी क्र. १/ प्रतिदाव्यातील वादी क्र. १ चे वारस संतोष अर्जुन कडलासकर याने आपले प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ३९ सोबत अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील मागणीप्रमाणे दुरूस्ती करणेस कोणतीही हरकत दिसून येत नाही. तसेच, दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागणेसाठी प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये ३००/– रूपयेचे खर्चाचे अटीवर मंजुर करणेत येत आहे.

२. प्रतिदाव्यातील वादी क्र. १ चे वारस रेकॉर्ड घेणेसाठी झालेला पाच महिन्यांचा विलंब माफ करण्यात येतो.

३. प्रतिदाव्यातील वादी क्र. १ चे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

२. प्रतिदाव्याच्या सरनाम्यामध्ये प्रतिदाव्यातील वादी क्र. १ चे वारसांनी अर्जामध्ये नमूद केलेप्रमाणे दुरूस्त करणेची परवानगी देण्यात येते.

३. प्रतिदाव्यातील इतर वादी यांनी सदर आदेशाप्रमाणे प्रतिदाव्यात दुरूस्ती १४ दिवसांमध्ये करणेची आहे व त्याची दुरूस्त प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल करणेची आहे.

४. खर्चाची रक्कम तालुका विधी सेवा समिती पंढरपूर यांना देण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/–

दिनांक– १८/०४/२०२३ श्रीमती एस. ए. साळुंखे

ठिकाण– पंढरपूर पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M.P.Gheradi ( L. G.) |
| Court | :- | $4^{th}$ Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 18.04.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 18.04.2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 20.04.2023 |